




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २५.०४.२०२५ | अंक नं. २२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# मनपाच्या नियोजनशून्य कामांमुळे निम्म्या शहरातील ‘दळणवळण ठप्प’

## संतप्त नागरिकांनी आयुक्तांना करून दिली जबाबदारीची जाणीव, कायदेशीर लढाई करण्याचाही दिला निवेदनाद्वारे इशारा

नगर – शहरात सध्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, ड्रेनेज लाईनची कामे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. या कामांचे कुठलेही नियोजन नसल्याने केवल रस्ते खोदून ठेवलेले असल्याने आणि कामासाठी नेमलेले ठेकेदार त्यांच्या सवडीनुसार अतिशय कासवगतीने कामे करत असल्याने निम्म्यापेक्षा जास्त शहराचे दळणवळणच सध्या ठप्प झाले आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेच्या नियोजन शून्य कारभारामुळे नागरिकांच्या घटनात्मक हक्कांवरच गदा आली असल्याचे सांगत या नागरिकांनी महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. तसेच या विरोधात कायदेशीर लढाईचाही इशारा दिला आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे की, भारताचे संविधान हे फक्त कायद्याचे पुस्तक नाही; ते आपल्या लोकशाहीचा श्वास आहे. ते प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्याने, सुरक्षितपणे व सन्मानाने जगण्याचा हक्क देते. परंतु, आज अहिल्यानगर शहरात या हक्कांची उघड उघड पायमल्ली होत आहे, आणि त्याचं मूळ आहे, महापालिकेच्या अकार्यक्षम, अव्यवस्थित आणि मनमानी पद्धतीनं सुरू असलेल्या पाईपलाईन व रस्ते विकास कामांमध्ये. यामुळे घटनात्मक हक्कांचा सरळ भंग होत असून गरोदर महिला, वृद्ध, लहान मुले यांचं सुरक्षितते सहित आरोग्यही

*(मजकूर व छायाचित्र पान ७ वर)*


**त्वरित डेन्टल क्लिनिक विकणे आहे**

अहिल्यानगरमध्ये,प्राईम लोकेशनमध्ये, झोपडी कॅन्टीन जवळ, मनमाड रोड टच, प्रशस्त वेलफर्निश रेन्टल, डेन्टल क्लिनिक विकणे आहे.

संपर्क वेळ : सायंकाळी ६ ते ८ पर्यंत

**9960356938**


# दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ २८ एप्रिल रोजी भिंगारमध्ये बंद

### सोमवारी सकाळी १० वाजता सामूहिक हनुमान चालिसा पाठ

नगर – जम्मू काश्मिरच्या पहलगाम येथील अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ २८ एप्रिल रोजी सकाळपासून दुपारी १२ वाजेपर्यंत ‘भिंगार शहर बंद’ पुकारण्यात आला आहे.

याबाबत सर्वपक्षीय शिष्टमंडळाने भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना निवेदन दिले आहे. या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा ‘भिंगार शहर बंद’ पुकारण्यात आला आहे. या दिवशी सकाळी १० वाजता भिंगार वेस येथील मारुती मंदिरात सामूहिक हनुमान चालिसा पाठ करण्यात येणार आहे. त्यानंतर दहशतवादी हल्ल्यातील मृतांना भिंगार शहराच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे. सदरचा बंद हा दुपारी १२ वाजेपर्यंतच पाळण्यात येणार असून, यामध्ये भिंगार शहरातील सर्व व्यापारी, नागरिक यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रकाश लुणिया, संभाजी भिंगारदिवे, सुनील लालबोंद्रे, महेश नामदे, संजय सपकाळ, विष्णू घुले, सचिन जाधव, नामदेव लंगोटे, रविंद्र लालबोंद्रे, संतोष बोबडे, श्याम वाघस्कर आदींनी केले आहे.



















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अतिक्रमणाच्या नावाखाली बेघर केलेल्यांचे पुनर्वसन करा

**मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू**

नगर - सरकारी जागेत अनेक वर्षांचे अतिक्रमण असलेल्या अनुसूचित जाती-जमाती व भटक्या, विमुक्त प्रवर्गातील कुटुंबीयांचे अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली त्यांना बेघर केले असून त्यांना त्या ठिकाणी पुनर्वसन एका बाजूस करण्याच्या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिली होती. मात्र कुठलेही कारवाई झाली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन चालू करण्यात आले.

यावेळी सेनेचे महाराष्ट्र राज्य सदस्य संजय वाल्हेकर, अहिल्यानगर जिल्हा प्रमुख सुनील शिंदे, जिल्हा समन्वयक किरण कणगरे, सिताराम शिरसाठ, पिनू भोसले, नाना जगताप, वंचित बहुजन आघाडीचे अनिल जाधव, बहुजन नेते सुधीर वैरागर, किशोर ससाने, स्वाती साठे, नंदू माळी, बाळासाहेब जाधव, रावसाहेब पवार, सोमनाथ जाधव, सोनू शिंदे, शिवानी माळी, गोपीनाथ शिंदे, सोनू भोसले, ऋतिक भोसले, ओंकार भोसले, बिरकी काळे, साईनाथ चव्हाण, रोहित भोसले, प्रिया चव्हाण, लताबाई चव्हाण, उज्वला चव्हाण आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.


सरकारी जागेत अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली बेघर केल्याने त्या ठिकाणी पुनर्वसन करून द्या या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

पुढे निवेदनात म्हंटले आहे की, वडगाव गुप्ता (ता. नगर) येथील महाराष्ट्र शासनाच्या शासकीय मोकळ्या जागेवर गेल्या २५ ते ३० वर्षांपासून अनुसूचित जाती-जमाती व भटक्या, विमुक्त प्रवर्गातील नागरिक राहत आहे. काही कुटुंबीय पक्के घर करून, तर काही झोपड्यात राहत आहे. त्यांना वडगाव गुप्ता ग्रामपंचायतीने नळ कनेक्शन दिले असून, ते पाणीपट्टी देखील ते भरत आहे. त्याचप्रमाणे विद्युत महावितरण मार्फत त्यांना लाईट मीटर घेण्यात आले असून, त्याचे बिल देखील ते अदा करत आहेत. अनेक वर्षापासून वास्तव्य असल्याने त्यांचे मतदार यादीतही नाव समाविष्ट असून, नुकतेच त्यांना नोटीसद्वारे जागा खाली करण्याचे सांगण्यात आले आहे. अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली हा उपेक्षित वर्ग बेघर केले व त्यामध्ये विविध जाती धर्माच्या लोकांची घरे पाडून त्यांना बेघर करण्यात आलेले आहे त्याची फार दयनीय अवस्था झालेली असून उपासमारीची वेळ आली असून ज्या पद्धतीने काही क्षेत्र जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या विखे फाऊंडेशनला ज्या पद्धतीने दिलेली आहे व काही ग्रामपंचायतीच्या माध्यमातून स्थानिक लोकांच्या नावावर करून दिलेली आहे. त्याच पद्धतीने अतिक्रमण धारकांना न्याय देऊन त्यामध्ये दोन हेक्टर क्षेत्र शिल्लक आहे. त्यामध्ये अतिक्रमण धारकांना विचारात घेऊन पुनर्वसन करण्याची मागणी केली होती. मात्र कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...




### चिंता नको- शक्यतो कार्यात व आनंदात राहा

नुकताच एक मोठ्या पॅकेजचा तरुण युवक आत्महत्या करून गेला. असंख्य शेतकरी दुर्दैवाने जीव संपवत आहेच. आजकाल तर लहान मुलांचे, युवकांचे तारुण्य लवकरच चिंतेत जात आहे. पांढरे केस, एकलकोंडेपणा, एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव, परीक्षा, करिअर घडवण्याची स्पर्धा, सामाजिक सुसंवादाचा ऱ्हास इ. गोष्टींमुळे मानसिक ताणतणाव सांभाळण्यात तरुण पिढी काहीशी कमी तर पडत नाही ना?

झालंय काय, ग्रामीण भागात पाण्यासह शेतीच्या तंत्रविकासातील दुर्भिक्षता इ.मुळे तेथे भयंकर बेरोजगारी वाढत आहे आणि शेती उत्पादनात मात्र कमी येणे सुरू झालंय.

शहरी भागात शिक्षण नसलेला तरुण मिळेल ते काम मिळवण्यात चिंतीत आहे तर मध्यम व उच्च श्रीमंती वर्गात यशस्वी होऊन कमी श्रमात व मार्गाने सेफ अधिकाधिक पैसा मिळवण्याच्या मागे धावणे चाललंय.

सामाजिक परिस्थिती तर भयानक झाली आहे. मोठे, व्यापक उद्दिष्ट नाही (जसं इंग्रजांच्या काळात स्वातंत्र्यप्राप्ती) अनेक राजकीय लोकांना तत्त्व, पक्ष इ. पेक्षा सत्ता, पैशाची काळजी, मुक बनून अन्याय पाहात बसणारा समाज, वास्तविकता बाजूला ठेवून स्वार्थ पाहणारा चौथा स्तंभ इ.मुळे वातावरण निराशाजनक आहे.

म्हणूनच आता आपल्या नागरिकांनाच आपल्याला स्वतःला प्रोत्साहित करावे लागेल. आईवडिलांना मुलांशी सुसंवाद वाढवावा लागेल. राज्यकर्त्यांनी भ्रष्टाचारी, दुष्कृत्य करणाऱ्यांना त्वरित शिक्षा करायला हवी. प्रत्येकालाच आवडत्या कला, छंदात वेळ द्यावा लागेल. सतत विधायक विचारप्रणालीने कार्यमग्न राहून आनंदी मनोवृत्ती ठेवाव लागेल. तरच आनंदी जीवनाचा निर्देशांक उंचावेल.

## नगर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर - जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये ९ मे रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.


पहलगामजवळील बायसरन परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा घर घर लंगर सेवेच्या वतीने निषेध करण्यात आला.

## पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**घर घर लंगर सेवेतर्फे बळी पडलेल्यांना श्रद्धांजली**

नगर - काश्मीर खोऱ्यातील पहलगाम जवळील बायसरन परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा घर घर लंगर सेवेच्या वतीने निषेध करण्यात आला. या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना तारकपूर येथील अन्न छत्रालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या श्रद्धांजली कार्यक्रमात जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सनी वधवा, सोमनाथ चिंतामणी, सुनिल थोरात, कैलाश नवलानी, डॉ. संजय असनानी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी दहशतवादाचा निषेध व्यक्त करुन भारत सरकारने याविरोधात ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

जनक आहुजा म्हणाले की, काश्मीरमध्ये निष्पाप नागरिकांवर अमानुषपणे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी संपूर्ण मानवजातीवरच आघात केला आहे. पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताच्या अखंडतेवर घाला घालत आहेत. हा हल्ला म्हणजे मानवतेवर झालेला घात आहे. भारत सरकारने आता यापुढे शांत राहू नये आणि कठोर भूमिका घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, दहशतवाद्यांच्या या कायर कृतींना आता तोंड द्यावे लागेल. धर्माच्या नावावर अशा प्रकारचे हिंसाचार घडवणे ही मानवतेची विटंबना आहे. काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता माजवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. भारताने आता ठोस आणि निर्णायक धोरण स्वीकारण्याची वेळ आली असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी भारत माता की जय..., पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या.

# पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा विहिंपकडून निषेध


पहलगाम येथील हल्ल्याच्या निषेधार्थ विहिंपच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

नगर - जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पर्यटनस्थळ असलेल्या पहलगाम येथील बैसरन घाटीमध्ये इस्लामिक दहशतवाद्यांनी पर्यटकांवर एक अत्यंत क्रूर व अमानवी हल्ला केला. या हल्ल्यात निष्पाप हिंदू पर्यटकांचे बळी गेले असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी धर्म विचारून हिंदू पर्यटकांना लक्ष्य करत ही भ्याड कृत्ये केली, ही बाब अत्यंत संतापजनक व राष्ट्रीय सुरक्षेला आव्हान देणारी आहे.

या घटनेच्या निषेधार्थ व हिंदू समाजाच्या रोषाला वाचा फोडण्यासाठी विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर यांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात दहशतवादी हल्ल्यातील गुन्हेगारांना लवकरात लवकर शोधून कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, केंद्र व राज्य सरकारांनी काश्मीरमध्ये सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलावीत, जेणेकरून भविष्यात अशा घटना घडू नयेत, दहशतवादास सतत खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर तिव्र निषेध करून योग्य ती कारवाई करण्यात यावी, देशातील सर्व हिंदूंनी संघटित होऊन अशा अमानवी प्रवृत्तींचा निषेध करावा व राष्ट्रीय सुरक्षेसाठी सजग राहावे. यासाठी सरकारने देखील जनजागृतीस प्राधान्य द्यावे.

संपूर्ण देशभरात आज संतापाची लाट पसरलेली असून हिंदू समाज प्रचंड अस्वस्थ आहे. अशा घटनांना आळा बसावा यासाठी आपण केंद्र सरकारकडे व संबधित यंत्रणांकडे वरील मागण्यांचे निवेदन सादर करावे. या मागण्या जिल्हाधिकारी यांच्याकडे विहिंपच्यावतीने करण्यात आल्या आहेत. याप्रसंगी विभाग मंत्री सुनील खिस्ती, जिल्हा मंत्री अनिल जोशी, जिल्हाध्यक्ष आशुतोष लांडगे, जिल्हा उपाध्यक्ष वसंत सिंग आदी उपस्थित होते.

# लाकडी दांडके व दगडाने मारुन केडगावमध्ये तरुणाचा निर्घृण खून

### ६ जणांवर गुन्हा दाखल

नगर - मागील काही दिवसापूर्वी झालेल्या भांडणाचा मनाचा राग धरून सहा जणांनी एका तरुणास भररस्त्यात लाकडी दांडके, दगड व लाथाबुक्क्याने बेदम मारहाण करुन त्याचा खुन केल्याची घटना केडगाव उपनगरातील रेणुका माता मंदिर जवळ शास्त्रीनगर येथे २४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता घडली. विपुल छोट्या काळे (वय ३०, देवी मंदिरापाठीमागे, शास्त्रीनगर, केडगाव) असे मयताचे नाव आहे.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात मयताची आई शास्त्री छोट्या काळे (वय ६०, रा. देवी मंदिरा पाठीमागे शास्त्रीनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की त्यांचा मुलगा विपुल काळे याचे मागील काही दिवसांपूर्वी सुरेश जाटला काळे, संदीप ढोल्या चव्हाण, कुणाल सुरेश काळे (तिघे रा. दूध सागर सोसायटी, केडगाव), चाईन फायर काळे, दारुचंद फादर चव्हाण व सुंदर नितीन काळे (तिघे रा. साठे वस्ती, शेंडी, ता. नगर) यांच्यासोबत फिर्यादीची मुलगी लसी चव्हाण हिला नांदवण्याच्या कारणावरुन वादविवाद झाले होते.

२४ एप्रिल रोजी सायंकाळी विपुल काळे हा त्याची बहीण मीना चव्हाण, लसी चव्हाण व दुर्गेश चव्हाण असे भाजीपाला आणण्यासाठी केडगाव देवी रस्त्यावर गेले होते. त्यावेळी सुरेश काळे, संदीप चव्हाण, कुणाल काळे, चाईन काळे, दारूचंद चव्हाण, सुंदर काळे यांनी विपुल काळे यास रस्त्यात अडवून मागील वादाच्या कारणावरुन लाकडी दांडके, दगड व लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याबाबत दुर्गेश चव्हाण यांनी घरी जाऊन शास्त्री काळे यांना सांगितल्याने त्या ताबडतोब घटनास्थळी गेल्या असता विपुल हा रक्तभंबाळ अवस्थेत पडलेला दिसला. त्यावेळी त्याला मारहाण करणारे तेथून पळून गेले. शास्त्री काळे यांनी विपुल यास जिल्हा शासकीय रुग्णालयात औषध उपचाराकरिता नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचार करण्यापूर्वीच मयत झाला असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी शास्त्री काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुरेश काळे, संदीप चव्हाण, कुणाल काळे, चाईन काळे, दारूचंद चव्हाण, सुंदर काळे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) १८९ (२) १९० प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे हे करीत आहे.

## २८ एप्रिल रोजी 'निधी आपके निकट' कार्यक्रम

नगर - निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी प्रसाद शुगर आणि ग्रो प्रॉडक्टस लिमिटेड, गेट क्र. ९१२ ते ९१५, वांबोरी ता. राहुरी येथे २८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या अडचणी असतील तर आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

# शाळकरी मुलींना 'बॅड टच' करत वारंवार गैरवर्तन, तरुणावर पोक्सो सह विनयभंगाचा गुन्हा दाखल

नगर - शाळेत शिकणाऱ्या लहान मुलींना जवळ बोलावून त्यांना 'बॅड टच' करत गैरवर्तन करून वारंवार त्रास देण्याची घटना शहरातील माळीवाडा परिसरातील एका शाळेसमोर घडली आहे. या प्रकरणी शाळेच्या गेटजवळ ताक विकणाऱ्या तरुणावर पोक्सो सह विनयभंगाचा गुन्हा कोतवाली पोलिसांनी दाखल केला आहे. वैभव बबन हुचे (रा.माळीवाडा अ.नगर) असे आरोपीचे नाव आहे.

या बाबत स्टेशनरोड वर राहणारे पिडित अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी २४ एप्रिल रोजी दुपारी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की त्यांची अल्पवयीन मुलगी माळीवाडा परिसरातील एका शाळेत इयत्ता चौथी मध्ये शिकत आहे. तिने २३ एप्रिल रोजी रात्री साडे नऊ वाजण्याचे सुमारास रडत रडत सांगितले की आमच्या शाळेच्या शेजारी गेटवर एक ताक विकणारा माणूस हा मला तसेच माझ्या मैत्रिणींना एक महिन्यापासुन त्रास देत असुन त्याने मला त्याच्याकडे बोलावुन घेवुन तुझे नाव काय आहे अस म्हणत त्याने तिचे गाल ओढले, तिच्या खांद्यावरुन गळ्यावरुन, अंगावरुन हात फिरवला त्यानंतर ती त्याला सोड म्हणाल्याने तो तिला म्हणाला की, घरी कोणाला काहीएक सांगायचे नाही. तसेच त्याच्याकडे गेलो नाही तर तो आमचे दप्तर हिसकावुन घेतो व बळजबरीने आमच्या अंगावरुन हात फिरवतो व आम्हांला 'बॅड टच' करतो असे सांगितले.

त्यामुळे २४ एप्रिल रोजी सकाळी ११.४५ वाजण्याचे सुमारास फिर्यादी हे शाळेच्या गेटवर खात्री करण्याकरीता थांबले. त्यावेळी शाळा सुटुन त्यांची मुलगी तिच्या आठ मैत्रिणीसह येत असताना ताकवाल्याने त्यांना बोलावून मुलीच्या अंगावर हात फिरवुन, मुलींचे गाल ओढून मानेवर हात फिरवल्याने फिर्यादी यांनी त्या ताकवाल्याला विचारले की, लहान मुलासोबत असे अश्लिल चाळे कशाकरीता करतो ? असे म्हणल्याने तो फिर्यादीची गचांडी पकडुन भांडणे करु लागला.त्यावेळी मुलींनी शिक्षकांना भांडण चालु असल्याचे सांगितल्याने शाळेतील शिक्षकांनी पोलीसांना फोन करुन घटनेची माहिती दिली. त्यावेळी त्या इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव वैभव बबन हुचे (रा.माळीवाडा अ.नगर) असे असल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादी हे कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरिता आले. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी हुचे याच्या विरुद्ध पोक्सो सह विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

# महिलेला शिवीगाळ करत ठार मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

नगर - तुझ्या नवऱ्याला घराबाहेर पाठव नाहीतर मी घरात घुसून मारुन टाकीन अशी धमकी देऊन महिलेस शिवीगाळ केल्याची घटना तपोवन रोडवरील राजवाडा हॉटेल मागे २४ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसात वाजता सुमारास घडली. याबाबत प्राजक्ता योगेश मच्चा (वय ३५, रा राजवाडा हॉटेल मागे, तपोवन रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की सिराज कमरुद्दीन खान (रा. हिंदुत्व चौक, समता कॉलनी, तपोवन रोड) हा त्यांच्या ओळखीचा असून पती योगेश मच्चा व सिराज खान यांच्यामध्ये पैशाचा व्यवहार झालेला आहे. २४ एप्रिल रोजी सिराज खान हा मच्चा यांच्या घरी आला व फिर्यादी मच्चा यांना म्हणाला तुझ्या नवऱ्याला बाहेर पाठव नाहीतर मी घराच्या आत घुसून मारुन टाकेल अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी प्राजक्ता मच्चा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सिराज खान याच्याविरुद्ध बी एन एस ३५२, ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

## बेबीबाई शिंगवी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - केडगाव येथील रहिवासी श्रीमती बेबीबाई पनालाल शिंगवी (वय ७०) यांचे २४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या किशोर, साई मोबाईल शॉपीचे प्रशांत व कांचना यांच्या मातोश्री होत तर पोपटलाल शिंगवी यांच्या भावजय होत. अतुल शिंगवी यांच्या काकू तर जयकुमार व दिलीप गांधी यांच्या बहीण होत.

## मनसुखलाल ठक्कर (मनु मामा) यांचे निधन

श्रीरामपूर - येथील भगतसिंग चौकातील जुनी घास गल्ली येथील ठक्कर कोल डेपोचे मालक, प्रवासी संघटनेचे सदस्य, रोटरी क्लबचे सदस्य व गुजराती समाजाचे विश्वस्त मनसुखलाल विश्रामभाई ठक्कर (वय ७८, मनु मामा) यांचे २४ एप्रिल रोजी दुपारी अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिलीपभाई व मनोजभाई ठक्कर यांचे चुलते होत.

## केडगावात गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगर - कत्तल करण्याच्या उद्देशाने गोवंशीय जनावरांना, कुठल्याही चारा पाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने बांधून वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडला. या कारवाईत ४ गोवंशीय जनावरांसह मालवाहू टेम्पो असा ४ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई केडगाव येथील अर्चना हॉटेल जवळ २५ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता करण्यात आली.

कोतवाली पोलीस केडगाव परिसरात रात्रगस्त घालत असताना माहिती मिळाली की पुणे कडून नगरकडे गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने घेऊन एक टेम्पो येत आहे. पोलिस मिळालेल्या माहिती वरुन केडगाव येथील अर्चना हॉटेल जवळ थांबले असता त्यांना पुण्याच्या दिशेकडून एक अशोका लेलँड कंपनीचा टेम्पो (क्र. एम एच १६ सी डी ४८८९) येताना दिसला. पोलिसांनी टेम्पो चालकास थांबण्याचा इशारा करुन थांबवले. टेम्पो चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आरफाज अख्तर कुरेशी (वय २२, रा.बेपारी मोहल्ला, झेंडीगेट) असे सांगितले. पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोच्या हौद्यामध्ये गोवंशीय जनावरे कुठल्याही चारापाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने बांधलेली दिसली. पोलिसांनी टेम्पोतील एक जर्सी गाय, तांबड्या रंगाची एक गाय व एक वासरु तसेच ४ लाख रुपये किंमतीचा टेम्पो असा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस अंमलदार अमोल गाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिस ठाण्यात अरफाज कुरेशी याच्याविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सुधारणा सन १९७६ चे कलम ५ (अ),१ सह प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ व मोटार वाहन कायदा कलम ६६ (१), १९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## चॉपर बाळगणाऱ्यास पकडले

नगर - काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने धारदार चॉपर बाळगणाऱ्या एकास तोफखाना पोलिसांनी बालिकाश्रम रोडवरील पंपिंग स्टेशन येथे २४ एप्रिल रोजी सायंकाळी पकडले. त्याच्याकडून एक चॉपर व दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला. पंपिंग स्टेशन येथे पोलिसांना एक पांढऱ्या रंगाची विनानंबरची मोपेड दिसली, त्यामुळे त्यांनी मोपेडचालकास थांबवुन गाडीच्या नंबर प्लेट व ड्रायव्हिंग लायन्स बद्दल विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांना त्याचा संशय आला. त्यामुळे त्याला मोपेडसह पोलीस ठाण्यात आणले. पोलिस मोपेडच्या डिक्कीची पाहणी करत असताना त्यांना त्यामध्ये एक लाकडी मुठ असलेला चॉपर मिळुन आला.

पोलिसांनी दुचाकी स्वारास त्याचे नाव विचारले असता त्याने अमोल गोरक्षनाथ भालेराव (वय २५, मुळ रा. पढेगाव, ता. श्रीरामपुर, हल्ली रा. गणेश चौकाजवळ, बोल्हेगाव) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडील एक धारदार पाते असलेला चॉपर, एक होंन्डा कंपनीची ॲव्हेटर मोपेड असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस अंमलदार सागर साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमोल भालेराव याचे विरुध्द भारतीय शस्त्र कायदा कलम ४/२५ प्रमाणे तसेच म.पो. अधिनियम कलम ३७ (१), (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# अनैसर्गिक अत्याचार प्रकरणातील आरोपींची पोलिसांनी केडगावमध्ये रस्त्याने काढली धिंड



नगर - केडगाव परिसरात १६ वर्षीय युवकाचे अपहरण करून त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करत गळा आवळून खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील ६ आरोपींची कोतवाली पोलिसांनी २४ एप्रिलला सायंकाळी केडगाव मध्ये रस्त्याने धिंड काढली. या आरोपींना पायी फिरवून आरोपींच्या घरी जाऊन घरची झडती व गुन्ह्याचा तपास केला.

केडगाव उपनगरात मित्राच्या घरी थांबलेल्या १६ वर्षीय युवकाचे १४ एप्रिल रोजी रात्री अपहरण करून त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करीत गळा दाबून खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात १२ जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी यातील आदित्य प्रशांत सोनवणे (वय २५,रा. शिवाजीनगर, केडगाव), ऋषिकेश सतीश सातपुते (वय २५, रा. पाटील कॉलनी, म्हसोबा चौक, केडगाव), शाहरुख अन्सार पठाण (वय २४ रा. कोतकर हाऊस जवळ, एकनाथनगर, केडगाव), ओंकार दत्तात्रय राहिंज (वय २२, रा. पाटील कॉलनी, म्हसोबा चौक, केडगाव), रोहित गणेश पंडागळे (वय २४, रा. संदीप हॉटेल समोर, नवीन गावठाण, केडगाव), मयूर अनिल आगे (वय २७, रा. राधाकृष्ण कॉलनी, एकनाथनगर, केडगाव) या ६ आरोपींना तात्काळ अटक केले, या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी तसेच आरोपींच्या रावण साम्राज्य ग्रुपची दहशत मोडून काढण्यासाठी या आरोपींची रस्त्याने धिंड काढण्यात आली. यावेळी कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सपकाळे, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील यांच्यासह पोलिस ठाण्यातील पोलीस अंमलदार उपस्थित होते.

# अक्षय्यतृतीयेनिमित्त सावेडीतील ‘चंदुकाका ज्वेल्स्’मध्ये सोनेरी फायदा योजनेचे आयोजन

नगर - सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स सुवर्णग्राहकांसाठी घेवून आले आहेत अक्षय्यतृतीया सोनेरी फायदा योजना.. या अंतर्गत फक्त १०% रक्कम भरून आपले सोने बुक करू शकतात. त्यानंतर बाजारात कितीही चढ उतार आले तरी त्याची तुम्हांला काहीही टेन्शन घेण्याची गरज राहिलेली नाही. कारण तुम्ही ज्या दिवशी सुवर्णखरेदी कराल त्या दिवशीचा सोन्याचा दर व बुकिंग केलेल्या दिवशीचा सोन्याचा दर यापैकी जो दर कमी असेल त्या दरात आपण सोने खरेदी करू शकतात. म्हणजे सुवर्णग्राहकांचा फायदाच फायदा.. याशिवाय येथील दागिन्याच्या मजुरीवर २०% पर्यंत, कुंदन व ठुशी ज्वेलरीच्या मजुरीवर ५०% पर्यंत सुट मिळणार आहे. येथे आपला जुना दागिना एक्सचेंज देखील करू शकतात. यावर १००% किंमतीचा परतावाही मिळु शकतो. अशा एकापेक्षा ही एक सरस फायद्याच्या ऑफर आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत. सदर योजना ही २२ कॅरेट दागिन्यांवर लागू आहे. योजना ३० एप्रिल पर्यंतच चालु असल्याने अधिकाधिक सुवर्णग्राहकांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे.

येथे नेहमीच नविन आणि लेटेस्ट फॅशनने परिपुर्ण अलंकार हजर स्टॉकमध्ये उपलब्ध असतात. कुंदन, टेम्पल, कलकत्ती व स्टोन सेटींगमधील दागिन्यांचे अप्रतिम डिझाईन्सचा भव्य श्रेणी आपल्यासाठी उपलब्ध आहे. ग्राहकांसाठी भविष्यातील फायद्याच्या सोने खरेदीसाठी सुवर्णसमृध्दी योजना आणली आहे. यामध्ये सहभागी होवून १० मासिक हप्ते भरा व योजना पुर्ण झाल्यावर दागिने खरेदी करताना भरघोस फायद्यासह मजुरीवर देखील भरघोस सुट मिळवू शकतात. याशिवाय लकी गोल्ड या योजनेत देखील ११ हप्ते भरा व खरेदी केलेल्या सोने खरेदीत मजुरीवर १०० टक्के सुट मिळवा.

ग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रुंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे.

चांदीमधील फॅशन ज्वेलरी फॉर्मिंगमधील (१ ग्रॅम सोन्यामधील) फॅशन ज्वेलरी, चांदी व सोन्या मधील आकर्षक फ्रेमही उपलब्ध. येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे चंदुकाका ज्वेल्सचे विशेष वैशिष्ट्ये. या विविध योजनांमुळे ग्राहकांना अधिकाधिक फायदा मिळणार आहे. या योजनेचा लाभ घ्यावा.

# आनंदतीर्थ येथे ३० एप्रिल रोजी वर्षितप पारणा महोत्सवाचे आयोजन

## ३० पेक्षा अधिक साधु-साध्वीजींच्या उपस्थितीत साजरा होणार तप अभिनंदन महोत्सव





नगर - राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.चे जन्मभुमी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील चिचोंडी या पवित्र भूमीवर साकारत असलेल्या भव्य तीर्थस्थान गुरु आनंद तीर्थ या ठिकाणी १२वा वर्षितप पारणा महोत्सव ३० एप्रिल अक्षय्य तृतीयेला होणार आहे.

आचार्य भगवंत श्री आनंदऋषीजी महाराजांची यावर्षि १२५ वी जन्म जयंती वर्ष असुन या निमित्त त्यांचे सुशिष्य अर्हम् विज्ञा प्रणेता उपाध्याय श्री प्रविणऋषीजींनी २०२४ मधे १००८ वर्षितपच्या तपश्चर्येची घोषणा केली व संपुर्ण देशातील भक्ता मध्ये या तपात शामिल होण्यासाठी आनंदाचा उत्साह संचारला. गुरुंचे शब्द आनंदाने स्वीकार करीत शेकडो गुरुभक्तांनी वर्षितपची धारणा केली. १ एप्रील २०२४ रोजी जवळजवळ ६०० हुन अधिक भाविकांनी वर्षितपाची धारणा संकल्प पुणे येथील निगडी येथे केली होती.

’बोले तैसा चाले’ हे साक्षात जगणारे उपाध्याय प्रवर आणि तीर्थेषऋषीजी म.सा. २०१० पासुन वर्षितप अनुष्ठान करीत आहेत. या वर्षि ही प्रतिभामुर्ती श्री शुभदाजी मसा सहीत अनेक संत आणि सती श्रद्धा आणि भक्तीचा परीचय देत वर्षितप अनुष्ठानात सहभागी झाले आहेत. असे पाचशेहून अधिक तपस्वी ३० एप्रिल रोजी या तपाची सांगता करण्यासाठी या तीर्थ भूमीवर येत आहेत.

जैन समाजाचे प्रथम तीर्थंकर श्री ऋषभ देव यांनी केलेल्या १३ महिन्याच्या तपश्चर्येचे प्रतीक म्हणून हजारो भाविक दरवर्षि ही तेरा महिन्यांची तपसाधना जप -तप- आराधने सहित करीत असतात व तप सांगता करण्यासाठी चिचोंडीला येतात.

आनंदऋषीजी महाराजांची पदस्पर्शाने व पावन उर्जेने संपन्न चिचोंडीत त्यांचेच सुशिष्य महापुरुष उपाध्याय श्री प्रवीणऋषिजी महाराजांच्या प्रेरणा व कुशल मार्गदर्शनात ‘गुरु आनंद तीर्थ ’हे भव्य दिव्य तीर्थ उभारणीचे काम गुरु आनंद फाउंडेशनद्वारे तीव्र गतीने सुरू आहे. केवळ धार्मिकच नाही तर मानव सेवा, समाज प्रबोधन, शिक्षण, व्यक्ती व समाज विकास- कल्याण अशा अनेक प्रयोजनातून येथे सप्ततीर्थ निर्माती होत आहे. लवकरच हे सर्व प्रकल्प पूर्ण निर्मीत होऊन गुरुभक्तांसाठी सज्ञ होणार आहे. अशा या तीर्थकडे आज जगभराचे डोळे लागले आहेत व डोळ्यांचे पारणे फेडणारे असे हे तीर्थ खुप लवकर समाज समर्पणासाठी सुसज्ञ होत आहे.

अशा या चिचोंडी येथील गुरु आनंद तीर्थ येथे अक्षय्यतृतीया व श्रमणसंघ स्थापना दिवस ३० एप्रिल रोजी दरवर्षिप्रमाणे हजारो गुरुभक्तांच्या उपस्थीत ५०० हुन अधिक वर्षितप तपस्वींचे पारणे होणार आहेत. उपाध्याय प्रवीणत्रषीजी म सा च्या श्रीमुखाने तपस्वींची आलोचना व अतियय दिमाखात शाही व्यवस्थेत तपस्वींचे पारणे होणार असून, या प्रसंगी स्वतः अर्हम् विज्ञा प्रणेता, उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषीजी म.सा.आदि ठाणा २ यांचे सहीत लोकमान्य प्रवर्तक श्री रूपमुनीजी म.सा (रजत) यांचे सुशिष्य युवा तपस्वी श्री मुकेशमुनीजी म. सा. आदि ठाणा ५, जिनशासन् गौरव, मधुरव्याख्यानी, महासतीजी श्री सुनंदाजी म.सा आदि ठाणा ६, दक्षिणज्योती महासतीजी श्री आदर्शज्योतीजी म.सा. आदि ठाणा ३, महाराष्ट्रप्रवर्तीनी श्री डॉ. ज्ञानप्रभाजी म.सा यांची आज्ञानुवर्तीनी, वात्सल्यमुर्ती श्री पुष्पचुलाजी म.सा. अनुशासनप्रिय श्री सुप्रियाजी म.सा. आदि ठाणा मथुर व्याख्यानी श्री ओजसदर्शनाजी म.सा.आदि ठाणा २ उपस्थित राहणार आहेत. यांचे पावन सानिध्यात देश विदेशातील शेकडों वर्षितप आराधक तपस्वी सम्मीलीत होउन गुरूचरणात पूर्ण ’श्रध्दा भक्ती और आस्था’ समर्पित करीत वर्षितप तपस्येचे शिखर महोत्सव साजरा करतील. हे दिव्य दृष्य पाहण्यासाठी व तपस्वींना अनुमोदना देण्यासाठी आपण सहपरिवार, श्रीसंघ सहित सादर आमंत्रित आहात. या मंगल पारणा महोत्सवचे पुण्यशाली लाभार्थी USA/ निगड़ी, प्राधिकरण येथील श्रीमत्ती ज्योत्स्नाबाई मुथ्था, राहुल मुथ्था, सौ. पुनम मुथ्था, आर्या, आरूवी एवं समस्त मुथ्था परिवार आहेत.

या कार्यक्रम आयोजनाच्या यशस्वीतेसाठी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली विभिन्न समीतींचे गठन करण्यात आले. १५० पेक्षा अधिक स्वयंसेवक यासाठी निरंतर परिश्रम घेत आहेत. गुरु आनंद फाउंडेशनच्यावतीने सर्व गुरु भक्तांना सादर आमंत्रण आहेत. तपस्वींना अनुमोदना व बहुमान देण्यासाठी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावावी. या वर्षितप पारण महोत्सवात, तुमच्या संबंधित विभागातील तपस्वींना जोडा आणि त्यांना पारण समारंभात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करा.

# अहिल्यानगरमध्ये २६ एप्रिलला ‘ब्लॉसम फॅशन शो’ चे आयोजन




नगर - २००४ साली स्थापन झालेल्या इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेने २० वर्षे पूर्ण केले असून त्यानिमित्ताने ब्लॉसम : २०२५ या फॅशन शो चे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची विशेष उपस्थिती असणार आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनायक देशमुख यांनी दिली.

याबाबत माहिती देताना विनायक देशमुख यांनी सांगितले की नगर-मनमाड रोड वरील मेघनंद लॉन्स येथे २६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख यांनी सांगितले की, संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात येणारा हा १७ वा फॅशन शो असून यावर्षीचा फॅशन शो निसर्ग या संकल्पनेवर आधारीत आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी पृथ्वी, समुद्र, व तारांगण या तीन विषयावर आधारित वस्त्र प्रावरणांची निर्मिती केली असून या डिझाइन्सचे मॉडेलच्या माध्यमातून रॅम्पवर सादरीकरण करण्यात येणार आहे. या फॅशन शो साठी ३५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विविध वस्त्र डिझाईन बनविले असून २५ मॉडेल्स त्या डिझाईन रॅम्पवर सादर करणार आहेत. याशिवाय लहान मुलांसाठी तयार करण्यात आलेल्या विविध गारमेंटचे सादरीकरण लहान मुले करणार आहेत. या फॅशन शो साठी शार्प मल्टीमीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. व मेकअप आर्टिस्ट सना शेख यांनी विशेष सहकार्य केले आहे.

या फॅशन शोच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे प्राचार्य आर्कि. अरुण गावडे यांच्या नेतृत्वाखाली फॅशन डिझायनिंग विभाग प्रमुख पूजा पतंगे, मेधा आसणे, कोमल बिडकर, स्मिता बडाख यांच्यासह महेश बालटे, चेतन वाडेकर, शिरीष गावडे, निकिता बेद्रे व करुणा गायकवाड प्रयत्नशील आहेत.

ब्लॉसम:२०२५ हा फॅशन शो निमंत्रितांसाठी आयोजित करण्यात आला असून याबाबतच्या प्रवेश पत्रिका आय.एस.डी.टी., कॅड पॉइंट निर्मल चेंबर्स मागे, लाल टाकी, अहिल्यानगर येथे उपलब्ध आहेत. अशी माहिती आय.एस.डी.टी. चे प्रशासकीय अधिकारी रोहन चारगुंडी यांनी दिली.

# प्रीतीज पाठशाला आणि कॅम्ब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्री-स्कूलतर्फे नगरमध्ये २७ एप्रिल रोजी ‘ड्रॉईंग आणि रंगभरण’ स्पर्धेचे आयोजन

नगर - प्रीतीज पाठशाला आणि कॅम्ब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्री-स्कूलच्यावतीने २७ एप्रिल रोजी ड्रॉईंग आणि रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा कॅम्ब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्रीस्कूल, गायकवाड कॉलनी, स्वामी समर्थ मठासमोर, मॅक केअर हॉस्पिटलजवळ, सावेडी येथे सकाळी ११ ते दुपारी १ यावेळेत होईल.

नर्सरी, एलकेजी, यूकेजी यांना फक्त रंगभरण असेल. इतर विद्यार्थ्यांसाठी चित्रकला आणि रंगभरण दोन्ही असतील. नर्सरीसाठी फुल, एलकेजीसाठी ख्रिसमस ट्री, यूकेजीसाठी घर आणि झाड, इयत्ता १ व २ रीसाठी फुलपाखरू किंवा जोकर, इयत्ता ३ व ४ थीसाठी माझा आवडता कार्टून पात्र, इयत्ता ५ ते ७वीसाठी पाणी हेच जीवन हे विषय असणार आहेत. नगरमधील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना सदर स्पर्धा खुली आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी अशा स्पर्धा घेण्यात येतात.

नोंदणी शुल्क फक्त ९९ रूपये असून प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला मेडल दिले जाईल. स्पर्धेत भाग घेऊन आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ९५२७४०४७२७ / ८७९३४४५५९८ / ८००७०००८९७ गुगल पे नंबर: ९५२७४०४७२७

# भाग्योदय विद्यालयामध्ये जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ कार्यक्रम



भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ कार्यक्रम निमित्ताने प्रमुख अधिकारी जलसंपदा विभाग श्रेणी २ सहाय्यक अभियंता श्रीमती रोहिणी सोनवणे, श्रीमती नयुमी कुसमुडे, गणेश लांघी, श्याम पवार, प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता प्राथमिक शाळा मुख्याध्यापक बन्सी नरवडे, बाबासाहेब कोतकर, शिक्षक इत्यादी उपस्थित होते.

नगर - भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ कार्यक्रम निमित्ताने प्रमुख अधिकारी जलसंपदा विभाग श्रेणी २ सहाय्यक अभियंता श्रीमती रोहिणी सोनवणे, श्रीमती नयुमी कुसमुडे, गणेश लांघी, कनिष्ठ लिपिक श्याम पवार, भाग्योदय माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता प्राथमिक शाळा मुख्याध्यापक बन्सी नरवडे, बाबासाहेब कोतकर, शिक्षक इत्यादी उपस्थित होते.

श्रीमती रोहिणी सोनवणे यांनी आपल्या मनोगतात जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा २०२५ या अभियानाचे रूपरेषा व उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यालयामध्ये रेन हार्वेस्टिंग, स्वच्छ सुंदर माझे विद्यालय, जल पुनर्भरण, पाणी स्वच्छता अभियान, घरगुती पाण्याचा अपव्यय टाळणे, नळाद्वारे वाया जाणारे पाणी थांबवणे, आंघोळीसाठी शॉवरचा वापर करू नये, जनावरे व वाहने धुण्यासाठी पाणी जपून वापरावे असे उपक्रम सांगून जल व्यवस्थापनाची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्रा.एकनाथ होले म्हणाले की, जल है तो कल है..., जल नही तो कल नही..., पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी ९७ टक्के पाणी महासागरात आहे. एक टक्के पाणी बर्फाच्या स्वरूपात आहे. एक टक्के पाणी फक्त गोड्या पाण्याच्या स्वरूपात आहे. गोड्या पाण्याचा वापर काटकसरीने व काटेकोरपणे केला पाहिजे. आपले जलसोत्र नदी, कालवे, बंधारे, स्वच्छ ठेवले पाहिजे, या पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे. शेतीसाठी पाणी वापर संस्थेने योग्य नियोजन करून पिकांना पाणी दिले पाहिजे. व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीतीलपिकांना पाणी दिले पाहिजे.

प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी प्रमुख जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांचे व विद्यार्थी व शिक्षक यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय बारगळ यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे शिक्षक कोतकर बाबासाहेब, साहेबराव कार्ले, सोपान तोडमल, संतोष काकडे, आदिनाथ ठूबे, उच्च माध्यमिक विद्यालयाचे कदम गोविंद, गोरक्ष कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, रूपाली शिंदे, रेणुका गुंड, गणेश गायकवाड, कावरे बाळासाहेब, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

शेवटी विद्यार्थ्यांना जल प्रतिज्ञा दिली गेली व कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठा सोयरीक संस्थेचा आळंदी येथे २७ एप्रिलला ‘मोफत वधू वर मेळावा’

नगर - मराठा सोयरीक संस्थेच्या वतीने आळंदी येथे मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा आयोजित केला असल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाचे आळंदी शहर प्रमुख राहुल चव्हाण, सेवानिवृत्त वनाधिकारी प्रभाकर कड पाटील, मराठा सोयरीक संस्थेचे संस्थापक अशोक कुटे यांनी दिली आहे.

नेहमीप्रमाणे मेळावा मोफत असून २७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता ज्ञानसागर मंगल कार्यालय, आळंदी देवाची, वडगाव-आळंदी रोड, ता.खेड जि.पुणे येथे होणार आहे. वधु वर पालकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवक अरुण कुरे, कविता बोंबले, ज्ञानेश्वर घुंडरे, सुनील काटे, रमेश वहिले, ज्ञानेश्वर मोरे, अर्जुन मेदनकर, भानुदास पऱ्हाड, माऊली घोडके महाराज, मनीषाताई सांडभोर, अमोल गांगर्डे, मंगल काळे, मंगल राक्षे आदींनी केले आहे.

येताना वधू-वरांनी स्वतः आधार कार्ड झेरॉक्स, बायोडाटा घेऊन पालकांसह मेळाव्यास यायचे आहे. अनेक वेगवेगळ्या तालुक्यातील व वेगवेगळ्या जिल्ह्यातील स्थळे या ठिकाणी बघायला मिळणार आहेत. अधिक माहितीसाठी ८४५३९०२२२२.

आज काल मुलांना लग्नासाठी लवकर मुली मिळत नाही, त्यांचे लग्न जमत नाही. तसेच शेतकरी मुलांसोबत कोणीही लग्न करायला तयार होत नाही. आपले नातेवाईक मित्रपरिवार यांना देखील वेळ मिळत नसल्यामुळे कोणीही स्थळ दाखवण्यात आता मदत करत नाही. म्हणून अशा वधू वर मेळाव्यांची दिवसेंदिवस गरज पडत आहे. मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत ९७ यशस्वी वधू वर मेळावे मोफत घेतले आहेत. या संस्थेकडून आतापर्यंत ४५०० पेक्षा जास्त लग्न जमून पार पडलेले आहेत. त्यापैकी ६५३ लग्न हे विधवा, विदुर, घटस्फोटीत यांचे पार पडलेले आहेत. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली जगदंब फाउंडेशन अंतर्गत हे मोफत मेळावे घेतले जातात.



छावणी परिषद (कॅन्टोन्मेंट) शाळेत महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

# एक स्त्री शिकली की आख्खं कुटुंब शिकतं

## व्याख्याते सुनील राऊत यांचे प्रतिपादन

भिंगार - पावणेदोनशे वर्षांपूर्वी स्त्री म्हणजे फक्त चूल आणि मूल अशा कर्मठ विचारांच्या व्यक्ती त्यावेळी होत्या. ’माणूस’ म्हणून आपण एकमेकांकडे पाहिलंच पाहिजे. महात्मा फुलेंची जयंती साजरी करतांना सामाजिक जाण व भान असणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करतांना, आम्ही माध्यम आहोत. कर्ता-करविता निर्मिक अर्थात परमेश्वर आहे. महात्मा ही उपाधी ११ मे १८८८ रोजी महाराष्ट्रातील व्यक्तींनी फुलेंना दिली आहे. सावित्रीबाईंना, ज्योतिबांनी शिकवलं. सावित्रीबाईंनी मुलींना शिकवलं. आज सावित्रीच्या लेकी प्रत्येक क्षेत्रात स्वतःच्या कार्याचा ठसा उमटवताहेत. मी कॅन्टोन्मेंट शाळेचा विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. आज शाळेने प्रगती केली आहे, असे प्रतिपादन सुनील राऊत यांनी केले.

छावणी परिषद (कॅन्टोन्मेंट) शाळेतील ८७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन माळी समाज बांधव, भगिनींनी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी केली.

याप्रसंगी महात्मा फुले मल्टीस्टेट पतसंस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव बनकर, महेश झोडगे, व्यावसायिक व भिंगार बँकेचे माजी संचालक अमोल धाडगे, भाग्यलक्ष्मी लॉन्सचे दीपक झोडगे, नाट्य-लघु चित्रपट लेखक, अभिनेते, व्याख्याते सुनील राऊत आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे सरांनी शाळेचे गुणवंत विद्यार्थी, वाचनालय, शाळेच्या प्रगती विषयी सांगितले. शिंदे सर म्हणाले की माळी समाज बांधव, भगिनींनी गरजूंना शैक्षणिक साहित्य देऊन सामाजिक जाणिवेने महात्मा फुले जयंती चांगल्या प्रकारे साजरी केली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल लवांडे आणि हजारे सर यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापक भोसले सर व विद्यार्थी उपस्थित होते.

# संत निरंकारी मिशनच्यावतीने मानव एकता दिवस व रक्तदान शिबीर



संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने मानव एकता दिवस निमित्त रक्तदान शिबिरचे उद्घाटन करताना डॉ. माजीद. समवेत जयकुमार खूबचंदानी, अनिल टकले, शिवाजी भोसले, रमेश तनवानी, रमेश कुकरेजा, किशन पंजवानी, जयकुमार रंगलानी, मोती आहुजा, दामोदर माखीजा, गणेश परभणे, सुरेश जाधव आदी. (छाया - किशोर खुबचंदानी)

नगर - प्रेम आणि बंधुभावना जागविणारा ‘मानव एकता दिवस’, संत निरंकारी मिशन द्वारे दरवर्षी २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ श्रद्धा आणि भक्तिभावनेने परिपूर्ण वातावरणात आयोजित केला जातो. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे.

मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशन कडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो जी नि:स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाशदेखील जनसामान्यांपर्यंत पोहचविला जातो. हा दिवस या गोष्टीचे परिचायक आहे, की सेवा केवळ एक कार्य नसून निष्काम समर्पण व आत्मिक भावनेचे द्योतक आहे.

यावर्षी सुद्धा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत पूर्ण भारतवर्षात सुमारे ५०० हून अधिक शाखांमध्ये रक्तदान शिबिरांची अखंड श्रृंखला आयोजित करण्यात आली. दिल्लीतील ग्राउंड नं. ८, निरंकारी चौक, बुराड़ी येथे आयोजित केलेले रक्तदान शिबिर या श्रृंखलेचा केंद्रबिंदू होता जिथे भाविकांनी रक्तदानामध्ये भाग घेतला. सर्वांनी उत्साह आणि समर्पण भावनेने स्वेच्छा रक्तदान करुन मानव कल्याणामध्ये आपला सहयोग दिला.

संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सुद्धा मिस्कीनरोड स्थित निरंकारी सत्संग भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. त्यात १२५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात महिलांची संख्या लक्षणीय होती. शिबिराचे उद्घाटन डॉ. एम. ए माजीद यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले, या प्रसंगी ’निरंकारी’ चे पदाधिकारी, सेवादल, भक्तगण उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढीचे सहकार्य लाभले

युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्यबोधाच्या माध्यमातून समाजाला समाज अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथांपासून मुक्त करुन नशमुक्ती, साधे विवाह आणि युवावर्गाला सकारात्मक विचारांशी जोडणे यांसारख्य लोककल्याणकारी अभियांनाची प्रेरक सुरवात केली. त्यांचे पावन मार्गदर्शन पुढे चालवत बाबा हरदेवसिंहजी यांनी रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको हा अमर संदेश देऊन रक्तदानाला मिशनच्या आध्यात्मिक सेवेचे अभिन्न अंग बनवले. हा संदेश आजदेखील प्रत्येक निरंकारी भक्ताच्या हृदयामध्ये सेवा आणि समर्पणाची प्रेरक ज्योत बनून तेवत आहे. आज सम्पूर्ण भारतभर आयोजित रक्तदान श्रृंखलेअंतर्गत सुमारे ३०,००० यूनिट रक्त संकलित करण्यात आले.

हा दिवस चाचा प्रतापसिंहजी यांच्यासह त्या सर्व समर्पित बलिदानी संतांच्या पुण्य स्मृतिचे प्रतीक आहे, ज्यांनी मानव एकता, निःस्वार्थ सेवा आणि आध्यात्मिक जागृतीच्या मार्गावर चालत असताना आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मानव एकता दिवस त्याच संतांचा दृढविश्वास व दृढसंकल्पाची प्रेरणा जीवंत करतो.

हे महाअभियान केवळ रक्तदान नसून सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे जे आम्हाला शिकवते, की मानवता हाच सर्वोच्च धर्म होय. याच प्रेरणेने युक्त संत निरंकारी मिशन, सेवा आणि समर्पणाच्या पथावर निरंतर मानवतेचा मार्ग प्रशस्त करत आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## नदी सर्वात मोठी, पण...

जगातील सर्वात मोठ्या नद्यांमध्ये दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीचा समावेश होतो. 'पृथ्वीचे फुफ्फुस' म्हटल्या जाणाऱ्या ॲमेझॉन जंगलाचे भरणपोषण करीत वाहणारी ही नदी गोड्या पाण्यात आढळणाऱ्या डॉल्फिन माशांचाही सर्वात मोठा नैसर्गिक



अधिवास आहे. शंभर प्रजातींचे इलेक्ट्रिक मासे आणि ६० प्रजातींचे पिऱ्हाना मासेही या नदीत आढळतात. पेरू, कोलंबिया, इक्वेडोर आणि ब्राझिल यासारख्या तब्बल नऊ देशांमधून वाहणाऱ्या या नदीवर एकही पूल नाही हे विशेष!

ॲमेझॉन नदी दक्षिण अमेरिकेच्या सुमारे ४० टक्के भागाला व्यापते. तिच्या खोऱ्यात ३ कोटींपेक्षाही अधिक लोक राहतात. तरीही या नदीवर पूल नाही हे खरे तर आश्चर्यकारकच आहे. त्याचे कारण काय आहे याची माहिती स्विस फेडरल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या स्वित्झर्लंडच्या ज्युरिखमधील संस्थेचे स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग विषयाचे तज्ज्ञ असलेल्या वॉल्टर कॉफमन यांनी दिली. त्यांनी सांगितले की ॲमेझॉन नदीवर पुलाची आवश्यकताच नाही! ॲमेझॉन नदी बहुतांशी ज्या परिसरातून वाहते, तिथे अतिशय कमी लोकसंख्या आहे. तसेच पुलाची दोन्ही टोके जोडण्यासारखे प्रमुख रस्तेही तिथे कमीच आहेत. नदीच्या काठी असलेल्या खेडी व शहरांमधील लोकांना प्रवास तसेच मालवाहतूक करण्यासाठी पुरेशा नावा आणि फेरी उपलब्ध आहेत. त्यामुळे तिथे कधीही पुलाची आवश्यकता भासत नाही.

शिवाय ॲमेझॉनवर पूल बांधण्याच्या मार्गात काही तांत्रिक व 'लॉजिस्टिक' आव्हानेही आहेत. या नदीचे दोन्ही काठ पूल उभा करण्याच्या दृष्टीने प्रतिकूल आहेत. तेथील माती अतिशय नरम आहे व दलदलीचे प्रमाण अधिक आहे. पूल उभा करण्यासाठी अतिशय खोल पाया काढावा लागेल. त्यासाठी बराच पैसा खर्च करावा लागू शकतो. तेथील हवामानही अतिशय चंचल आहे आणि पाण्याच्या खोलीत सातत्याने बदल होत असतो. त्यामुळेही तिथे पुलाचे बांधकाम करणे कठीण आहे. या नदीच्या पाण्याचा स्तर वर्षात अनेक वेळा वाढत किंवा कमी होत असतो. अशा विविध कारणांमुळे आजपर्यंत या लांबलचक व मोठ्या नदीवर एकही पूल नाही!

## 'महाविनाशावर' नवा प्रकाश

सुमारे २५० दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवरील ८० टक्के जीवसृष्टी नष्ट करणारा 'महाविनाश' वनस्पतींसाठी इतका विनाशकारी नव्हता, असे नवीन जीवाश्म संशोधनातून समोर आले आहे. वैज्ञानिकांनी चीनमध्ये असा एक परिसर शोधला आहे, जिथे त्या विनाशकारी घटनेतही वनस्पती टिकून राहिल्या.

हा मोठा विनाश २५१.९ दशलक्ष वर्षांपूर्वी पर्मियन युगाच्या शेवटी आणि ट्रायसिक युगाच्या सुरुवातीला घडला. त्या काळात पृथ्वीवरील भूप्रदेश प्रामुख्याने एकत्रित होता आणि तो पँजिया या महाखंडाच्या रूपात अस्तित्वात होता. मात्र, हळूहळू तो विभाजित होण्याच्या प्रक्रियेत होता. सायबेरियन ट्रॅप्स नावाच्या ज्वालामुखी प्रणालीतून मोठ्या प्रमाणावर ज्वालामुखी उद्रेक झाले, ज्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण अत्यंत वाढले. एका २०२१ च्या अभ्यासानुसार, त्या काळात वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण सुमारे २५०० पीपीएमपर्यंत पोहोचले होते, जे आजच्या ४२५ पीपीएमच्या तुलनेत बरेच जास्त आहे.

या ज्वालामुखी उद्रेकांमुळे जागतिक तापमानवाढ आणि महासागर आम्लता वाढली, ज्यामुळे समुद्रातील परिसंस्थांचा मोठ्या प्रमाणावर नाश झाला.

मात्र, जमिनीवरील परिस्थिती स्पष्ट नव्हती, कारण त्या काळातील भूस्तरांमध्ये आढळणारे जीवाश्म अत्यंत मर्यादित आहेत. नवीन संशोधनानुसार, आजच्या ईशान्य चीनमध्ये असलेल्या एका भागात वनस्पतींना हा विनाश फारसा परिणामकारक ठरला नाही. तिथे बियांची



निर्मिती करणारी जिम्नोस्पर्म वनं तसेच फर्न्स (स्पोअर निर्मिती करणाऱ्या वनस्पती) वाढत राहिल्या. 'किमान या भागात तरी आम्हाला वनस्पतींचा महाविनाश झाल्याचे पुरावे आढळत नाहीत,' असे अभ्यास सहलेखक आणि मिसुरी युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी येथील भूगर्भशास्त्र आणि भूभौतिकीचे प्राध्यापक वान यांग यांनी सांगितले.

'सायन्स ॲडव्हान्सेस' या नियतकालिकात प्रकाशित या संशोधनानुसार, 'महाविनाश' हा समुद्रात जितका व्यापक होता, तितका तो जमिनीवर नव्हता. काही भागांमध्ये परिसंस्था तुलनेने अबाधित राहिल्या, याचा अर्थ भूगर्भशास्त्र आणि पुराजीवशास्त्र यांच्यात या घटनेचा अधिक सखोल अभ्यास करण्याची गरज आहे.

## हातापायांची लांबी असमान असल्यास...



लिंब डिस्क्रीपेन्सिस म्हणजेच हातापायांची लांबी असमान किंवा एकसारखी नसल्याची समस्या अनेकांमध्ये दिसून येते. यामागे जन्मजात काही कारणे असू शकतात. एका पायाची वाढ कमी होणे, पायाच्या हाडाचा काही भाग विकसित न होणे, मांडीच्या हाडाची अपूर्ण वाढ अशा समस्यांचे ओझे घेऊन अनेक रुग्ण आपले आयुष्य कंठत असतात. काही वेळा अपघातजन्य कारणेही असू शकतात. मोठ्या अपघातांनंतर हाडांची चुकीची जुळणी झाल्यामुळे किंवा फ्रॅक्चर झाल्यानंतर हाडांची वाढ खुंटल्यामुळे ही समस्या उद्भवू शकते. याखेरीज पोलिओ, बोन इन्फेक्शन (ऑस्टिओमायल्टिस), न्युरॉलॉजिकल विकार, मांडीच्या हाडाला पुरेसा रक्तपुरवठा न होणे यामुळेही हाता-पायांची लांबी एकसारखी नसण्याची समस्या उद्भवू शकते.

लिंब डिस्क्रीपेन्सिसमुळे, चालण्यात तफावत निर्माण होते. तसेच पाठीच्या कण्यावर अतिरिक्त ताण येतो. सांधेदुखी आणि गुडघेदुखीच्या समस्या उद्भवतात. पायांच्या स्नायूंवर जास्त ताण येतो. दीर्घकाळ त्याकडे दुर्लक्ष केल्यास कंबरदुखी आणि गुडघ्यातील समस्या वाढतात. अशा प्रकारच्या समस्यांवर उपचार आहेत, याविषयी अनेकांना माहिती नसते. वास्तविक, पूर्वी अशक्य वाटणाऱ्या हाता-पायांच्या विकृती आणि असमान लांबीच्या समस्यांचे आता प्रभावीपणे उपचार करता येतात. इलिझारोव्हसारखे तंत्रज्ञान यामध्ये अत्यंत प्रभावी ठरते. या तंत्रज्ञानाच्या मदतीने बुटक्या पायांचे रुग्ण देखील हाता-पायांची लांबी वाढवू शकतात. या आधुनिक तंत्राने पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले हाड, तुटलेले किंवा काही भाग गमावलेले हाड, तसेच अपंगत्वासारख्या समस्या प्रभावीपणे बऱ्या करता येतात. काही वेळा गंभीर अपघात झाल्यानंतर हात-पाय कापण्याचा सल्ला दिला जातो. पण याबाबत त्वरित निर्णय घेण्याआधी इलिझारोव्ह तंत्रज्ञानाचा विचार करणे निश्चितच फायद्याचे ठरते. . देशातील मोजक्या इलिझारॉव्ह तज्ज्ञांपैकी एक असलेले डॉ. सुहास शाह सांगतात की, ही रशियन शस्त्रक्रिया विकृती सुधारणा, गुंतागुंतीच्या फ्रॅक्चर, जन्मजात अपंगत्व, पोलिओमुळे झालेल्या विकृती व हात-पायांची असमान लांबी सुधारण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

इलिझारोव्ह हे हाडांच्या पुनर्निर्मितीसाठी, विकृती सुधारण्यासाठी आणि हात-पाय लांब करण्यासाठी वापरले जाणारे अतिशय प्रभावी तंत्र आहे. हे तंत्र सोव्हिएत सर्जन डॉ. गॅव्हरील इलिझारोव्ह यांनी १९५० च्या दशकात शोधून काढले. गुंतागुंतीचे फ्रॅक्चर्स, अपघातानंतर हाडे पुनर्संचयित करण्यासाठी, जन्मजात हाडांच्या दोषांसाठी, पोलिओमुळे किंवा इतर कारणांमुळे पायातील असमानता दूर करण्यासाठी ते प्रभावी ठरते हे गेल्या १६ वर्षांत एक हजारांहून अधिक शस्त्रक्रियांच्या अनुभवातून दिसून आले आहे.



इलिझारोव्ह फ्रेम ही विशिष्ट धातूची रिंग-संरचना असून ती असणारा फिक्सेटर हाडाच्या भोवती बसवला जातो. हाडात लहान छिद्र करून स्टेनलेस स्टीलच्या तारा आणि पिन्स टाकल्या जातात. या फ्रेमच्या मदतीने हळूहळू हाडांचे तुकडे हलवले जातात, ज्यामुळे नवीन हाडांची वाढ होते. हाड लांब करण्यासाठी दररोज थोड्या प्रमाणात म्हणजे साधारण १ मिमीपर्यंत फ्रेम समायोजित केली जाते. हळूहळू नवीन हाड तयार होऊन पाय किंवा हाताची लांबी वाढते किंवा तुटलेले हाड व्यवस्थित जुळते. यामुळे शरीराच्या नैसर्गिक हाड-वाढीच्या प्रक्रियेस चालना मिळते. विकृती आणि तुटलेली हाडे अधिक प्रभावीपणे बरी करता येतात. परिणामी, उंची वाढवण्यासाठी हा अतिशय सुरक्षित आणि प्रभावी उपाय म्हणून पुढे आला आहे. इलिझारोव्ह तंत्र आधुनिक ऑर्थोपेडिक्समध्ये एक प्रभावी आणि क्रांतिकारी उपचार पद्धती मानली जाते. जन्मजात बुटकेपणा असणाऱ्या रुग्णांसाठी तसेच पोलिओ किंवा सेरेब्रल पाल्सीमुळे पायांमध्ये विकृती निर्माण झालेल्यांसाठी, त्याचबरोबर कर्करोग किंवा इतर शस्त्रक्रियेमुळे हाडांचा काही भाग काढून टाकावा लागल्यास, गंभीर इन्फेक्शनमुळे हाडे कमकुवत झाल्यास हे तंत्र प्रभावी ठरते. शरीर आपोआप नवीन हाड तयार करण्यासाठी साधारण तीन ते सहा महिने कालावधी लागतो; पण यामुळे रुग्णांना नवीन आयुष्य मिळते. ही संपूर्ण प्रक्रिया काही महिने अत्यंत काळजीपूर्वक केली जाते आणि त्यामुळे १० ते १२ इंचपर्यंत नवीन हाड तयार होऊ शकते. युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँड, बाल्टीमोर येथील प्रा. डॉर पेले आणि इटलीतील प्रा. कॅटेनी व कॅटाग्नी यांच्या मार्गदर्शनाखाली या तंत्रज्ञानाचे विशेष प्रशिक्षण घेतल्यानंतर एक हजारहून शस्त्रक्रिया आम्ही यशस्वी केल्या आहेत.

अलीकडील काळात एलिझारोव्ह अँजिओप्लास्टी या नवीन शस्त्रक्रियेचा विकासही करण्यात आला आहे. ही शस्त्रक्रिया डायबेटिक फूट या गंभीर आणि वेगाने वाढत चाललेल्या आजारामध्ये प्रभावी ठरते. कारण या आजारात बरेचदा पाय कापण्याची वेळ येते. पण ही आपत्ती टाळण्याचे काम एलिझारोव्ह अँजिओप्लास्टीद्वारे केले जाते. ही शस्त्रक्रिया रक्तप्रवाह ३०० टक्क्यांनी वाढवत असल्यामुळे जखम भरून येते. डायबेटिक न्यूरोपथीमुळे संवेदनशक्ती गमावलेल्या रुग्णांना पुन्हा संवेदना येतात. मुख्य म्हणजे पाय कापण्याचे गंडांतर टळते. खरे पाहता एलिझारोव्ह शस्त्रक्रिया भारतात १८ वर्षांपूर्वी सुरू झाली आहे; पण अजूनही अनेक डॉक्टरांना याबाबत पुरेशी माहिती नसल्यामुळे आजही डायबेटिक फूटमध्ये अनावश्यकपणे पाय कापले जातात. तथापि, जेव्हा पर्याय संपल्यासारखे वाटते, तेव्हा या शस्त्रक्रियेने आशेचा नवा किरण मिळू शकतो. डायबेटिक फूटमुळे पाय कापल्यामुळे असो किंवा हातापायांची लांबी असमान असल्यामुळे असो; जन्मभर अपंगत्वाचे शल्य मनात घेऊन जगण्यापासून रुग्णांची सुटका करणे हे एलिझारोव्हचे सर्वात मोठे बलस्थान आहे.

- डॉ. सुहास शहा

संपर्क : ९३२२२३५०४२

## प्राचीन शार्कचे सापडले जीवाश्म



टकीच्या मॅमथ गुहेतील खोल भागात जीवाश्म गोळा करणाऱ्या संशोधकांना एक अतिशय लहान आणि अनोख्या खिळ्यासारख्या दातांच्या शार्कचे जीवाश्म सापडले आहे. या नव्या प्रजातीचे नाव क्लॅव्हसोडेन्स मॅकगिनिसी ठेवण्यात आले असून, तिला 'मॅकगिनिसचा नेल टूथ' असेही संबोधले जात आहे. हा प्राणी सुमारे ३४० दशलक्ष वर्षांपूर्वी अस्तित्वात होता आणि ओब्रुचेवोडिड पेटालोडॉन्टस्? या शार्क गटाचा भाग होता. या गटातील शार्कला त्यांच्या अगदी छोट्या आकारामुळे आणि अनोख्या दातांमुळे 'चिपमंक शार्क' असेही म्हणतात.

३ ते ४ इंच (७.५ ते १० सेमी) लांब असलेले हे शार्क समुद्राच्या तळाशी राहणाऱ्या खेकडे, अळ्या आणि इतर लहान जीवांवर उदरनिर्वाह करीत असत, असे नॅशनल पार्क सर्व्हिसने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्यांचा लहान आकार त्यांना मोठ्या शिकारींपासून वाचवण्यास मदत करत होता. 'जर्नल ऑफ पॅलिओन्टोलॉजी'मध्ये प्रकाशित अभ्यासात संशोधकांनी या नव्या प्रजातीचे अधिकृतपणे अनावरण केले. या शार्कला मॅकगिनिसचे नाव सेवानिवृत्त राष्ट्रीय उद्यान अधीक्षक डेव्हिड मॅकगिनिस यांच्या सन्मानार्थ देण्यात आले आहे. तसेच, त्याचे दात जुन्या लोखंडी खिळ्यांसारखे दिसत असल्यामुळे त्याला 'नेल टूथ' असे संबोधले जाते. मॅमथ गुहा ही जीवाश्म संशोधनासाठी एक अनमोल खजिना आहे. या गुहेत आतापर्यंत ७० हून अधिक वेगवेगळ्या प्राचीन माशांच्या प्रजाती सापडल्या आहेत, असे 'पार्क्स स्टूवर्डशिप फोरम' या नियतकालिकातील २०२४ च्या अभ्यासात नमूद केले आहे. या गुहेतील पाण्याच्या प्रवाहांनी कार्बोनिफेरस युगातील (३५८.९ ते २९८.९ दशलक्ष वर्षांपूर्वी) सागरी गाळ जतन केलेला खडक तयार केला आहे. त्यामुळे संशोधकांना या खडकांच्या माध्यमातून त्या प्राचीन सागरी पर्यावरणाचा अभ्यास करण्याची अनोखी संधी मिळते, असे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

## चिनी संशोधकांकडून एआय एजंट 'मॅनुस'

सध्याचे 'एआय' हे 'एएनआय' म्हणजेच 'आर्टिफिशियल नॅरो इंटेलिजन्स' आहे. ते मानवी बुद्धिमत्तेच्या तुलनेत कमी दर्जाचे आहे. मात्र भविष्यात 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स' म्हणजेच मानवी बुद्धिमत्तेच्या तोडीची कृत्रिम बुद्धिमत्ता येऊ शकते असे म्हटले जाते. पुढील वर्षापर्यंतच असे 'एआय' येईल असाही काहींचा कयास आहे. त्या पार्श्वभूमीवर आता चिनी शास्त्रज्ञांनी 'मॅनूस' नावाचा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) एजंट सादर केला आहे, जो मानवी निर्देशांशिवाय स्वतंत्र निर्णय घेऊ शकतो. 'बटरफ्लाय इफेक्ट' या चिनी स्टार्टअपने विकसित केलेला हा 'एआय' एजंट संपूर्णपणे स्वायत्त बुद्धिमत्तेचे उदाहरण असल्याचा दावा कंपनीने केला आहे. या 'माणूस' नव्हे 'मॅनुस'ला 'आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स एजंट' मानले जात आहे, कारण तो सध्याच्या एआय प्रणालींपेक्षा



अधिक स्वायत्तपणे कार्य करतो.

हा 'एआय' चॅटजीपीटी किंवा डीपसीकसारख्या चॅटबॉटस्सारखा मजकूर सूचनांना प्रतिसाद देतो, मात्र तो सततच्या सूचनांविना विविध प्रकारची कामे करू शकतो. 'मॅनुस' सर्वसामान्यांसाठी अद्याप उपलब्ध नाही, मात्र काही जणांना मर्यादित आमंत्रण कोडस् मिळाल्यानंतर त्याचा ऑनलाईन वापर उत्सुकतेने सुरू झाला आहे. काही वापरकर्त्यांनी फक्त साध्या निर्देशांवरून व्हिडीओ गेम्स तयार केले, तर काहींनी वेबसाइटस्? डिझाइन करून प्रकाशित केल्या. तथापि, हा 'एआय' अजून सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि त्यास फीडबॅक लूपमध्ये अडकणे, अचानक क्रॅश होणे आणि चॅटजीपीटीच्या तुलनेत जास्त चुका करणे यांसारख्या समस्या भेडसावत आहेत. पीक जी, या प्रकल्पाचे मुख्य शास्त्रज्ञांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर याला नवीन तंत्रज्ञानाच्या सुरुवातीच्या अडचणींचा भाग म्हटले आहे. 'एमआयटी' टेक्नॉलॉजी रिव्ह्यूच्या पत्रकार कैवेई चेन यांना 'मॅनुस' वापरण्याची संधी मिळाली. त्यांनी याला 'अत्यंत हुशार आणि कार्यक्षम इन्टर्नसोबत काम केल्यासारखा अनुभव' असे म्हटले. मात्र, त्यांनी असेही नमूद केले की 'मॅनुस' अनेकदा आपल्याला नेमके काय करायचे आहे हे पूर्णपणे समजून घेत नाही, चुकीच्या गृहीतकांवर काम करतो आणि काहीवेळा काम सोपे करण्याच्या नादात चुका करतो. 'हे आशादायक आहे, पण अजून परिपूर्ण नाही,' असे चेन यांनी लिहिले.

## उन्हाळ्यात काकडी ठरते 'सुपरफूड'!

*उन्हाळा आला की कैरीचे पन्हे, लिंबू सरबत, नारळपाणी, नाचणीची आंबील वगैरे थंडावा देणाऱ्या पेयांची रेलचेल सुरू होते. त्याचप्रमाणे कलिंगड आणि काकड्याही हटकून आपल्या आहारात समाविष्ट होत असतात. उन्हाळ्याच्या सुपरफूडस्ची यादी काकडीशिवाय अपूर्णच आहे. काकडीत सुमारे ९६ टक्के पाणी असते, जे उन्हाळ्यात शरीराला हायड्रेट ठेवते. हे ताजेपणा देते आणि आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. काकडीमध्ये भरपूर जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारते, वजन नियंत्रणात राहते आणि पचनसंस्था मजबूत होते. काकडी उन्हाळ्यात डिहायड्रेशनपासून संरक्षण करते. हे कमी कॅलरीज असलेले अन्न आहे. म्हणून, वजन व्यवस्थापनातही मदत होते. त्यात असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंटस्? त्वचेच्या आरोग्यासाठी चांगले असतात. काकडी शरीराला डिटॉक्सिफाय करण्यास देखील मदत करते.*

**काकडीचे हे काही लाभ...**

**• शरीर हायड्रेटेड ठेवते**

दररोज किमान ७-८ ग्लास पाणी पिणे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. यामुळे पचनक्रिया, सांधेदुखी, मूत्रपिंडाचे कार्य, स्मरणशक्ती आणि शरीराचे तापमान नियंत्रणात राहते. जर खूप उष्णता असेल किंवा कोणी पुरेसे पाणी पीत नसेल तर काकडी हा एक चांगला पर्याय असू शकतो. त्यात ९६ टक्के पाणी असते, जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. ते सॅलड म्हणून खाऊ शकता.

**• हाडे मजबूत करते**

काकडीमध्ये व्हिटॅमिन के आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते, जे हाडांसाठी खूप फायदेशीर आहे. काकडी खाल्ल्याने हाडांची ताकद वाढते आणि फ्रॅक्चरचा धोका कमी होतो.

**• पचनास मदत करते**

काकडीत असलेले पाणी आणि फायबर पचनक्रियेला मदत करतात. हे अन्नाचे योग्य पचन आणि पोषक तत्त्वांचे शोषण करण्यास मदत करते. फायबर बद्धकोष्ठता रोखण्यासाठी आणि पोट स्वच्छ ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे.

**• वजन नियंत्रणात राहते**

काकडीमध्ये कॅलरीज कमी असतात आणि त्यात उच्च पौष्टिक मूल्य असते. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**• मधुमेहींसाठी फायदेशीर**

काकडीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. त्याचा ग्लायसेमिक भार देखील कमी आहे. म्हणून, काकडी खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढत नाही. याशिवाय, काकडीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंटस्? मधुमेहामुळे होणाऱ्या गुंतागुंतीपासून देखील संरक्षण करतात.



**• हृदयाचे आरोग्य सुधारते**

काकडीमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त आणि सोडियमचे प्रमाण कमी असते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. त्यामध्ये असलेले फायबर आणि क्युकरबिटासिन बी कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि धमन्यांमध्ये चरबी जमा होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करतात. यामुळे हृदयरोगांचा धोका कमी होतो.

**• कर्करोग रोखते**

काकडीमध्ये क्युकरबिटासिन बी (CuB) नावाचे संयुग असते. यामुळे यकृत, स्तन, फुफ्फुस आणि प्रोस्टेट कर्करोगाचा धोका कमी होतो. हे कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखण्यास आणि नष्ट करण्यास देखील मदत करू शकते. काकडीच्या सालीमध्येही कर्करोग रोखणारे घटक असतात. त्यामुळे काकडी सोलून न काढता खाणे अधिक फायदेशीर आहे. दररोज १ ते २ मध्यम आकाराच्या काकड्या खाणे सुरक्षित आणि फायदेशीर आहे.

**• अतिसेवनाचे दुष्परिणाम**

- जास्त काकडी खाल्ल्याने पोटात गॅस, वेदना किंवा अपचन होऊ शकते कारण त्यात फायबरचे प्रमाण जास्त असते.
- काकडीमध्ये व्हिटॅमिन के भरपूर असते. त्यामुळे रक्त गोठण्याचा धोका वाढू शकतो. जर तुम्ही रक्त पातळ करणारी औषधे घेत असाल तर जास्त काकडी खाऊ नका.
- काकडीमध्ये पोटॅशियम असते, जास्त काकडी खाल्ल्याने प्रीकॅलेमिया होऊ शकतो. जर आधीच किडनीची समस्या असेल तर किडनी निकामी होण्याचा धोका असू शकतो.
- काही लोकांना काकडीची ॲलर्जी असू शकते, ज्यामुळे खाज सुटणे, सूज येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

# मनपाच्या नियोजनशून्य कामांमुळे निम्म्या शहरातील 'दळणवळण ठप्प'

(पान १ वरुन)

धोक्यात आले आहे. उघडे गटार, उडत असलेली धूळ, गढूळ पाणी व नळांमधून सडलेला वास यामुळे श्वसनाचे विकार, त्वचा रोग, डेंग्यू, मलेरिया यासारख्या साथींची शक्यता निर्माण झाली असून गर्भवती महिलांना सोनोग्राफीसाठी पोहोचणेही जीवावर बेतत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार नागरी भागात स्वच्छ पाणी, हवा, आणि नियंत्रित ध्वनीप्रदूषण हे मूलभूत आरोग्य निकष आहेत जे पूर्णतः पायदळीतुडवले जात आहेत.





गटार कामासाठी शहरात खोदून ठेवलेले रस्ते छायाचित्रात दिसत आहे. (छाया – लहू दळवी)

### गर्भवती महिलांची अवस्थाच गंभीर

शहरात सध्या ज्या भागात अनेक दिवसांपासून रस्ते खोदाई करून ठेवलेली आहे, त्या भागात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रीती देशपांडे यांच्या हॉस्पिटलसह अनेक क्लिनिक, दवाखान्यांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या गरोदर महिलांना खड्डे, धूळ, रात्रीचे मशीनरीचे आवाज, आणि अचानक उभ्या राहणाऱ्या यंत्रणांमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सोनोग्राफीसाठी येणाऱ्या महिलांना वेळेवर हॉस्पिटलमध्ये पोहोचताच येत नाही. अशी परिस्थिती सध्या शहरात पहावयास मिळत आहे.

### हा विकास नसून अराजकपणा

उघडे चेंबर्स, न सापडणारे रस्ते, कुठलाही फलक वा संकेत नसणे, रात्री कोणताही प्रकाश नसल्यानं अपघात घडत आहेत. नागरिक, वृद्ध, दिव्यांग यांना रस्त्यावरून फिरणं म्हणजे दरवेळी जीव मुठीत धरून जाव लागत आहे. या कामांसाठी कोणतेही वेळापत्रक नाही, रस्ता बंद करण्याची सूचना नाही, नागरिकांचा सल्ला नाही, काहीही सार्वजनिक माहिती नाही. हा विकास नसून दहशत निर्माण करणारा अराजकपणा आहे.

### व्यवसाय मोडीत काढले गेलेत

अनेक महिन्यांपासून सुरु असलेल्या या संथ गतीच्या कामांमुळे किराणा दुकान, दूधवाले, टायर पंक्चरवाले, फेरीवाले, रस्त्यावरील छोट्या व्यवसायिकांना ग्राहक मिळेनासे झालेत. धूळ, आवाज, अडथळ्यांमुळे त्यांचा गाडा थांबला आहे. लोकांचे रोजगार हिरावले गेलेत आणि ते कोणालाच दिसत नाही? अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. जर लोक उपाशी मरणार असतील तर हा विकास काय चाटायचा काय?

### नागरी सन्मानाचा अपमान, कर भरणाऱ्यांना शिक्षा?

नागरिक वेळेवर महापालिकेचा कर भरतात; त्यातूनच अधिकाऱ्यांचे वेतन दिले जाते, पण या नागरिकांनाच जर खड्डे, धूळ, अपघात, गटारातील मैल्याचा वास, आणि आरोग्य धोक्यांची शिक्षा भोगावी लागत असेल तर कर भरणं म्हणजे शासनाच्या चुकीची सबसिडी आहे का? महिनोन महिने सुरू असलेलं परंतु पूर्णत्वास न गेलेलं काम, आणि कुठलाही स्पष्ट वेळापत्रक नसल्यानं रस्ते केवळ अर्धवट नाही, तर मृतप्राय झाले आहेत. नागरिकांना याचा केवळ गैरसोयीचा नव्हे, तर जीवघेण्या संकटाचा सामना करावा लागत आहे. प्रत्येक दिवस हा एक संकटाचाखेळ झाला आहे.

### आपत्कालीन सेवाही पूर्णपणे ठप्प

शाळेत जाणाऱ्या मुलांची बस अडकते. अपंग व्यक्तींना घराबाहेर पडणं अशक्य होतं. वृद्ध नागरिकांना दवाखान्यात जाणं म्हणजे थेट धाडसाचं काम. किरकोळ व्यवसाय उध्वस्त झालेत. नागरिक धुळ, आवाज आणि अस्थिरतेच्या खोल गर्तेत अडकले आहेत. पण याहून गंभीर म्हणजे –आपत्कालीन सेवा पूर्णपणे ठप्प झाल्यात. अग्नीशमन, पोलीस, ॲम्ब्युलन्स या तीनही जीवन रक्षक सेवा वेळेवर घटनास्थळी पोहचू शकत नाहीत. रस्त्यावर अचानक खड्डा, उघडा चेंबर, मशीनरी आडवी, परिणामी ॲम्ब्युलन्स वेळेत पोहचत नाही, आणि रुग्णाचा जीव धोक्यात येतो. पोलीस यंत्रणा वेळेत हस्तक्षेप करू शकणार नाही आपत्कालीन स्थितीमध्ये अग्नीशमन दल थांबतं परिणामी आगीवर नियंत्रण मिळवण्याआधी नुकसान दुपटीने वाढू शकते.

### संतप्त नागरिकांच्या 'या' आहेत प्रमुख मागण्या

हा उशीर केवळ अकार्यक्षमतेचा नाही, तो एक–एक जीवाच्या हकाचा अपमान आहे. विकासकाम जर जीव घेऊ लागला, तर ते विकास राहात नाही ते विनाश बनतो. म्हणून विशाल गणपती, साठेवस्ती, आनंदी बाजार, देशपांडे दवाखाना, गौरी घुमट जवळ रस्त्यांचे काम जिथे वर्षानुवर्षे चालू असल्याचे भासवून एकेरी रस्ता वापरावा लागत असलेले पोलीस परेड, न्यू आर्टस् कॉलेज आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना जोपर्यंत कामे पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत करातून तातडीची सूट द्यावी.

कामांच्या संपूर्ण शेड्यूलसह सार्वजनिक आराखडा, मान्यतेचे दस्तऐवज व ठेकेदाराची माहिती ऑनलाईन प्रकाशित करावी. रस्त्यावर आरोग्य सुरक्षा प्रमाणित फलक, सिग्नल, प्रकाश व्यवस्था व गटारांचे संरक्षण त्वरित करावे. स्वतंत्र आरोग्य निरीक्षण पथकस्थापून दर आठवड्याला अहवाल सादर करावा. गर्भवती महिलांसाठी वैद्रद्यकीय प्रवेश रस्ता वाहन मार्ग खास चिन्हांकित करावा. सध्याच्या अराजकतेला जबाबदार अधिकाऱ्यांवर दंडात्मक शिस्तभंग / कारवाईची प्रक्रिया सुरु करावी. अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. नगरसेवक नसतानाही अधिकारी वर्गावर संपूर्ण दायित्व आहे. नागरिकांच्यावतीने जनहित याचिकेचा पर्याय खुला आहे, असेही यामध्ये म्हंटले आहे.

### ठेकेदारांच्या मनमानीला चाप कधी लावणार?

मोठमोठ्या मॉल्स, बिल्डिंग्स, कमर्शियल प्रोजेक्ट्स यांची कामं काही दिवसांतच पूर्ण होतात. स्लॅब एका रात्रीत टाकले जातात, मजले आठवड्या भरात उभे राहतात. मग त्याच शहरात, त्या महापालिकेच्या छायेखाली, एका सिमेंट रस्त्याला अनेक महिने का लागतात? अहिल्यानगरमधील विशाल गणपती मंदिराजवळील क्रिडा संकुल, खाजगी बस थांबे, बस स्टैंड हे सर्व महत्त्वाचे, दैनंदिन गर्दीचे केंद्रबिंदू असूनही, त्यांचं काम ठेकेदाराच्या मनमानीमुळे अर्धवट पडलं आहे. महिन्यांनंतरही कोणतीही ठोस प्रगती नाही; लोक रोज त्रास सहन करत आहेत.एका विभागातील सिमेंट रस्ता ७–८ दिवसांत पूर्ण होऊ शकतो, हे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. मगच काम हे दिवसा गणिक नाही, तर इच्छेवर चालतंय – हेच सिद्ध होतं.

त्यामुळे संबंधित ठिकाणची रस्त्यांची कामे ८ दिवसांच्या आत पूर्ण करण्यासाठी सर्व मजूर, मशीन, यंत्रणा एकत्र लावाव्यात. काम दिवसा सलग चालवावं, रात्री चालल्यास ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट मध्ये टाकून मोठा दंड ठोठावण्यात यावा आणि नागरिकांना वेळीच सुविधा मिळवून द्याव्यात.ही मागणी नाही, ही नागरी हक्कांची अट आहे. आणि जर ती पुन्हा दुर्लक्षित झाली, तर कायद्यानुसार कारवाईसाठी नागरिक सज्ज आहेत. ही फक्त मागणी नाही; ही संविधानिक हक्कांची आठवण आहे. ही झोपलेली व्यवस्था हलवणारी कडक सूचना आहे. सत्तेचा उपभोग थांबवा नागरिकांना मोकळा श्वास घेवू द्या असेही अजिंक्य गुरावे यांच्या सह नागरिकांनी या निवेदनात म्हंटले आहे.



शहरातील विविध ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले.

## पट्टीत भरमसाठ वाढ करून पाणीपुरवठा सुरळीत नाही

### पूर्ण दाबाने पुरवठा झाला नाही तर नागरिकांसह जल आंदोलन

नगर – नागरिकांना पाणीपट्टी भरमसाठ आकारण्यात आली आहे. मग त्यांना सुरळीत पाणीपुरवठा केला पाहिजे, परंतु असे होताना दिसत नाही. गेल्या अनेक दिवसापासून शहरात विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वन वन भटकंती करावी लागत आहेत. पाण्यासाठी नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. नळाला पाणी आले, तर ते कमी दाबाने येत आहे. उन्हाळ्यात नागरिकांचे असे हाल करणे दुर्दैवी आहे. सामान्य नागरिकाला दिवसाआड पाणी मिळत आहे, ते ही वेळेवर आणि पुरेसे नाही, ही परिस्थिती केवळ प्रशासनाची उदासीनता नव्हे, तर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा अपमान आहे, असे प्रतिपादन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले.

शहरातील विविध ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी भगवान फुलसौंदर यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले व चर्चा केली.

पुढे बोलताना फुलसौंदर म्हणाले की, मनपा प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, हीच आमची मागणी आहे. आम्ही आज जे निवेदन देत आहोत, ते केवळ एक कागदाचा तुकडा नाही. ती लाखो नागरिकांची आर्त हाक आहे. लवकरात लवकर पाणी प्रश्नावर तोडगा काढून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा झाला पाहिजे नाहीतर नागरिकांसह शहरात जल आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

या निवेदनात म्हटले की, गेल्या पंधरा वीस दिवसांपासून महानगरपालिकेचा पाणी पुरवठा व्यवस्थापन संपुर्ण शहरात विस्कळीत झाले आहे. शहराचे उपनगर असलेले केडगाव, सावेडी, बोल्हेगाव, नागापुर, सावित्रीबाई फुलेनगर, विनायकनगर, फुलसौंदर मळा, बुरुडगाव रोड, तसेच नगर शहरामधील मध्य वस्तीत पाणीपुरवठा होत नाही. ऐन उन्हाळयाच्या दिवसात सर्व नागरीकांना पिण्याच्या पाण्याची गरज असतानाच पालिकेकडून त्यांना पाणि उपलब्ध होत नाही. कर्मचाऱ्यांचे फोन बंद असतात. विचारणा केल्यास उडवाउडवीची उत्तरे मिळतात. तरी आपण स्वतः लक्ष घालुन पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा नागरीकासंह जनआंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

## गांधी मैदान, आनंदी बाजार, गौरीघुमट, नालेगाव परिसरातील पाण्याच्या निचऱ्याचा ५० वर्षाचा प्रलंबित प्रश्न सुटेल : वसंत लोढा

### आयुक्त यशवंत डांगे यांनी केली पाहणी

नगर – गांधी मैदान, चितळे रोड, लक्ष्मी कारंजा, पटवर्धन चौक, आनंदी बाजार, गाडगीळ पटांगण तसेच नालेगाव परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होत नव्हता. गेल्या पन्नास वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित होता. नागरिकांच्या घरांमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी जात होते. हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गेल्या पंचवीस वर्षापासून पाठपुरावा करीत आहोत. महायुती सरकारने शहराच्या विकासासाठी दीडशे कोटी रुपयांचा निधी दिला. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या निधीमुळे हे काम पूर्णत्वास येत आहे. तसेच या प्रलंबित प्रश्नासाठी या भागातील नगरसेवक गणेश कवडे, अजय चितळे, संतोष गेनाप्पा, सुभाष लोंढे व शहराचे लोकप्रतिनिधी यांनीही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. तसेच गाडगीळ पटांगण ते सीना नदीपर्यंत बंदपाईप गटाराचे कामासाठी तत्कालीन खासदार सुजय विखे यांनी चाळीस लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. गौरी घुमट, गांधी मैदान, आनंदी बाजार, रंगार गल्ली परिसरातील हे पाईपलाईनचे व ड्रेनेजचे काम लवकरात लवकर व्हावे. यासाठी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेतली असता त्यांनी स्वतः या कामाची पाहणी करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना मे महिन्याच्या अखेरपर्यंत काम पूर्ण करून द्यावे. अशा सूचना केलेल्या आहेत. हे काम चांगल्या पद्धतीने व्हावे. यासाठी आमचे बारकाईने लक्ष आहे. गौरीघुमट परिसरातील पाण्याच्या निचऱ्याचा गेल्या ५० वर्षाचा प्रलंबित प्रश्न सुटेल असे प्रतिपादन वसंत लोढा यांनी केले आहे.



गांधी मैदान, आनंदी बाजार, गौरीघुमट, नालेगाव परिसरातील कामाची मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह वसंत लोढा यांनी पाहणी केली.

गांधी मैदान व गौरी घुमट येथील परिसरातील पाईपलाईन व ड्रेनेजच्या कामाची पाहणी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केली. याप्रसंगी भाजपचे वसंत लोढा, ओबीसी सेलचे उपाध्यक्ष बाळासाहेब खताडे, संजय वल्लाकट्टी, मनीष लोढा, राजेंद्र औटी, सागर शिंदे, प्रकाश मुथा, राजेंद्र बलदोटा, संदीप शिंदे आदी उपस्थित होते.

## जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता १ ते ४ मे दरम्यान मुंबईमध्ये 'वेव्हज् परिषद'चे आयोजन

मुंबई – केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ–व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. १ ते ४ मे या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (MOU) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे, सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २५/०४/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे केडगांव** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३१३/१ | २.५६ | ६.३५ |
| + पो.ख. | ०.०५ | |
| एकुण | २.६१ | |

यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे मध्यभागाचे संपुर्ण क्षेत्र ० हे. ४२.६७आर. हि शेतजमीन मिळकत.

**यांसी चतुःसीमा –**

पूर्वेस : सर्व्हे नंबर ३२१
दक्षिणेस : सर्व्हे नंबर ३१३/१ पैकी क्षेत्र व ओढा
पश्चिमेस : सर्व्हे ३१२
उत्तरेस : सर्व्हे नंबर ३१३/१ पैकी क्षेत्र

**विद्यमान मालकांचे नाव –**
**श्री. बाळासाहेब हरिभाऊ मतकर**
रा. देवी रोड, मतकर मळा, केडगांव, अहिल्यानगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला,
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २५/०४/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील** खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १४३/१ | ४९ | १९८.०० चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट |

**यांसी चतुःसीमा –**

पूर्वेस : ९.०० मीटर रस्ता
दक्षिणेस : ६.०० मीटर रस्ता
पश्चिमेस : प्लॉट नं. ४८
उत्तरेस : प्लॉट नं. ५०

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**१. बाळासाहेब गणपत निमसे**
**२. रचना बाळासाहेब निमसे**
रा. मांडवे, ता. जि. अहिल्यानगर

**ॲड.आर.टी.शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स,
दाळमंडई, अहिल्यानगर


## वीज, रस्ते, पाणीसह इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच उद्योजकांच्या अडचणी वेळेत सोडवा

### डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश

नगर – औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योजकांना वीज, रस्ते, पाणी यासह इतर मुलभूत सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याबरोबरच उद्योजकांच्या अडचणी समन्वयातून वेळेत सोडविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकीत डॉ. आशिया बोलत होते.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समितीच्या बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया आणि इतर.

बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप, उद्योग अधिकारी अशोक बेनके, बालाजी बिराजदार यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.पंकज आशिया म्हणाले, औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. सुरळीत वाहतुकीसाठी उपाययोजना करण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे स्टॉलधारक व्यवसाय करत असल्याच्या तक्रारी आहेत. असे स्टॉल जप्त करण्यात यावेत. औद्योगिक क्षेत्रात सुरक्षिततेच्यादृष्टीने पोलीस गस्त वाढवण्यात यावी. त्याठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

औद्योगिक क्षेत्राला पुरेशा प्रमाणात विद्युत पुरवठा करण्यासाठी ट्रान्सफार्मर दुरुस्ती, विद्युत वितरणामध्ये येणारे अडथळे प्राधान्याने दूर करण्यात यावेत. परिसरामध्ये विद्युत सबस्टेशन उभारणीसाठी जागा उपलब्धतेबाबत कार्यवाही करावी. क्षेत्रामध्ये असलेल्या ड्रेनेजची पावसाळ्यापूर्वी स्वच्छता करण्यात यावी. त्याचबरोबर कचऱ्याची नियमितपणे विल्हेवाट लावत परिसर स्वच्छ राहील यादृष्टीनेही आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांना आयुष्यमान भारत योजनेतून आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्राच्या भागामध्ये खासगी दवाखाने असल्यास त्यांच्या माध्यमातून सेवा देण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत. या भागामध्ये असलेल्या विविध चौकांच्या सौंदर्यीकरणाची कामे सीएसआरच्या माध्यमातून करण्यात यावीत. औद्योगिक क्षेत्रामध्ये कौशल्यावर आधारित प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागेची तपासणी करण्याच्या सूचनाही डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे यांनी विषयाशी संबंधित माहिती दिली.

